राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेमध्ये “Technology Upgradation by Establishment of incinerator facility अंतर्गत Incinerator ची उभारणी करणे” या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवधन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक - पविआ-१०१७/प्र.क्र.१२७/पदुम-३,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२,
दिनांक -१५ डिसेंबर, २०१७.

संदर्भ:- कृषि व पदुम विभाग क्रमांक - आरकेव्ही-०३१७/सी.आर.१४/आरकेव्हीवाय कक्ष, दि ९ जून २०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

अन्न व औषध प्रशासन विभागाने लसनिर्मितीच्या प्रकल्पास आदर्श उत्पादन पध्दती (CGMP) चा अवलंब करणे अनिवार्य केले आहे. महाराष्ट्र प्रदूषण मंडळ Bio Medical waste (Management & Handling) नियम १९९८ अन्वये शेडयूल - I व शेडयूल - V मध्ये दिलेल्या स्टॅण्डर्डनुसार जैविक कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यासाठी incinerator ची आवश्यकता आहे.

परंपरागत Bio Medical waste ची विल्हेंवाट लावण्याच्या पध्दतीमध्ये कायद्यानुसार सुधारणा करणे निकडीची बाब होती. Technology Upgradation by Establishment of incinerator facility अंतर्गत incinerator च्या वापरामुळे विषारी सेंद्रिय संयुगे, कुजणारे व सडणारे Bio Medical waste पूर्णत: निष्क्रीय केले जाऊन वातावरणातील विषारी वायू प्रदूषण व संसर्गजन्य रोग प्रादुर्भावास आळा घालतस येईल. त्यामुळे पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेमध्ये आदर्श उत्पादन पध्दतीचा अवलंब करुन " Technology Upgradation by Establishment of incinerator facility अंतर्गत Incinerator ची उभारणी करणे " ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीची २३ वी बैठक दि.२५ मे २०१७ रोजी झाली. सदर बैठकीमध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था,औंध,पुणे-७ या संस्थेमध्ये “Technology Upgradation by Establishment of incinerator facility अंतर्गत Incinerator ची उभारणी करणे” या प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने खालीप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यांत येत आहे.

शासन निर्णय :-

३. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था,औंध,पुणे-७ या संस्थेमध्ये आदर्श उत्पादन पध्दती, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ Bio Medical waste (Management & Handling) नियम १९९८ नुसार “Technology Upgradation by Establishment of incinerator facility अंतर्गत Incinerator ची उभारणी करणे” या प्रकल्पास शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान

करण्यात येत असनू, प्रकल्पाचा खर्च रु.५०.०० लक्ष एवढा असून, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून रू. ५०.०० लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरचा प्रकल्प सन २०१७-१८ मध्ये राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीने मान्यता दिल्यानुसार व उपलब्ध होणाऱ्या निधीच्या अधिन राहून राबविण्यात यावा.

४. **<u>प्रकल्पाचे आर्थिक निकष :-</u>**

या प्रकल्पामध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत.

अ.क्र	तपशील	बाबनिहाय अपेक्षित खर्च
१.	पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेमध्ये Technology Upgrada Establishment of incinerator facility अंतर्गत साहित्य खरेदी, बां विद्युतीकरणासह व इतर शुल्क कर इ.सह उभारणी करणे	रु.४९,१९,२००/-
२.	प्रशासकीय खर्च (१%)	रु.४९,१९२/-
	एकूण किंमत -	रु.४९,६८,३९२/-

राज्यस्तरीय प्रकल्प मंजूर समितीने उपरोक्त बाबनिहाय खर्चास मान्यता प्रदान केली असल्याने, बाबनिहाय खर्चात कोणताही बदल करण्यात येऊ नये.

५. अस्तित्वात असलेल्या इमारतीतील बांधकामातील फेरफार, विद्युत उपकरणे इ. प्रकल्पातील बाबींना मा.आयुक्त पशुसंवर्धन यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करावी. तसेच सदरचा प्रकल्प शासकीय विहित पध्दतीचा अवलंब करुन राबविण्यास या शासन निर्णयाव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

६. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२१४१६०९३५४५०१ असा आहे. या आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Vikas Tulshiram Kadam

Digitally signed by Vikas Tulshiram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, cn=Vikas Tulshiram Kadam
Date: 2017.12.15 11:59:18 +05'30'

(विकास तु.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. प्रधान सचिव (कृषि व फलोत्पादन) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, पुणे-७.
५. सहसचिव (राकृवियो) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण)
७. निवड नस्ती पदुम-३.